निशाणी क्रमांकः–५६

<u>प्रतिवादीतर्फे उलटतपास विद्वान विधिज्ञ श्री. बी.पी. वर्मा यांचेमार्फत –</u>

५.        हे म्हणणे खरे आहे की, सर्व दावा मिळकती हया कुकाणा या गावी आहेत. मला दावा मिळकतिंची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत जमिन ही माझ्या जावयाची वडिलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतिची विल्हेवाट लावण्याचा संपुर्ण अधिकार हा माझे जावयांना होता. मी दोन महिन्यापुर्वी दावा मिळकतीत गेलो होतो. मी नेहमी दावा मिळकतीत जात असतो. सदरचा दावा हा अतिक्रमण काढून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट नंबर ९०/१ मधील २१ आर जमीन ही माझे जावई गोरक्षनाथ अभंग यांनी अजित मंडलीक यांना विक्री केली होती. त्या व्यवहाराची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, जी जमीन अजित मंडलिक यांना विक्री केली त्याच्या शेजारी माझी मुलगी कांचन हिने बंगला बांधलेला आहे. तो बंगला अजित मंडलिक यांना जमीन विक्री करण्यापुर्वी बांधलेला होता.

६.        दत्तात्रय फुलसौंदर हे वादींचे नातेवाईक आहेत. हे मला माहित नाही की, माझे जावई गोरक्षनाथ व अजित मंडलिक यांच्यादरम्यान जो चुक दुरुस्तीचा दस्त झाला होता त्यावरील दत्तात्रय फुलसौंदर हे पंच साक्षीदार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अजित मंडलिक यांना जे २१ गुंठे जमिन विकली होती, ती १०० फुट रुंद आणि

२३० फुट लांब अशी होती. हे म्हणणे खरे नाही की, अजित मंडलिक यांना जी २१ गुंठे जमिन विक्री केली होती त्याच्या काही क्षेत्रफळामध्ये माझी मुलगी कांचन हिने बंगला बांधलेला आहे. हे मला माहित नाही की, माझे जावई गोरक्षनाथ व अजित मंडलीक यांच्यामध्ये जो चुक दुरुस्तीचा लेख झाला होता त्यानुसार अजित मंडलिक यांना पुर्व–पश्चिम १२० फुट व दक्षिण–उत्तर १९१ फुट देण्यात आले, ते क्षेत्र रस्त्याच्या मध्यापासुन ६५ फुट सोडून विक्री केलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, अजित मंडलिक यांनी सदर २१ आर जमिन ही त्यांची पत्नी राजनंदीनी मंडलिक यांना विक्री केली त्यानंतर ती २१ आर जमिन ही राजनंदीनी मंडलिक यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना विकली. हे म्हणणे खरे आहे की, सदर जमिन खरेदी केलेपासुन प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकतीत प्रतिवादी क्र.१ भारत, प्रतिवादी क्र.३ गुरुनाम यांची कपडयाची दुकाने आहेत.

७. मी दावा मिळकतिंचे उतारे एवढयामध्ये पाहिलेले नाही. गट नंबर ९०/१ चे किती तुकडे झाले ते मी **सांगु शकत** नाही. हे मी सांगु शकत नाही की, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना जे २१ गुंठे जमिन विक्री करण्यात आलेली आहे त्याला आता गट नंबर ९०/१/अ/१ हा पडलेला आहे. हे मी सांगु शकत नाही की, सदर गट नंबर ९०/१/ अ/१ ला प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या नावे वेगवेगळे क्षेत्रफळ लागलेले आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या जवळ अभंग कुटुंबियांच्या

जमिनी आहेत. माझे जावई गोरक्षनाथ यांच्यावर दारुची कुठलीही केस झालेली नाही. माझे जावई गोरक्षनाथ यांनी वादी क्र.१ आशित व वादी क्र.२ प्रणव यांच्या नावे गट नंबर ९०/१ मधील १४ आर जमिनीचे बक्षीसपत्र करुन दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या बक्षिसपत्रावर मी व दत्तात्रय फुलसौंदर असे साक्षीदार होतोत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी दावा मिळकतीवर अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SUNIL NAGORAO BHOSLE

Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2026.01.06 17:16:15 +0530

**(एस.एन. भोसले)**

दिनांक : ०६/०१/२०२६ — दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

नेवासा — नेवासा